<u>महाराष्ट्र शासन</u>

क्रमांक-पुलदे-२०१९/प्र.क्र.३१/ सां.का.२
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
<u>दिनांक :- १७.०६.२०१९</u>

<u>वाचा</u> :- १. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे क्र. पुलदे-१३८८ दि.३१.५.२०१९
२. वित्त विभाग शासन परीपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/वित्तीय सुधारण-१, दि.०२.१२.२०१३
३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९, दि.२६.११.२०१४
४. वित्त विभाग शासन परीपत्रक क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तीय सुधारण-१, दि.०२.०८.२०१६
५. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग ३/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
६. वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१८/प्र.क्र.११३/१३/आ.पु.क., दि.११.१२.२०१८

<u>शासन आदेश</u>

उपर्निर्दिष्ट क्र.१ च्या संदर्भात पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना असे कळविण्यात येते की, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी या कार्यालयातील क संवर्गातील सरळसेवेच्या मंजूर पदांपैकी रिक्त पदांची कामे करण्यासाठी, **<u>निम्नश्रेणी लघूलेखक-०१, भांडारपाल-०१, रोखपाल-०१, वाहनचालक-०१, संगणकचालक-०१ अशी एकूण ०५ पदांच्या</u>** सेवा बाह्ययंत्रणेद्वारे ई-निविदा प्रक्रियेद्वारे एल-१ ठरण्याऱ्या संस्थेशी करार करून उपर्निर्दिष्ट क्र.२ ते ६ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन तसेच त्यातील अटी/शर्तींच्या अधीन उपलब्ध करुन घेण्यास शासन मंजुरी देत आहे.

०२. श्री. ओम साई स्वयं रोजगार, सुरक्षारक्षक व इतर सेवा पुरवठा सहकारी संस्था, नांदेड यांच्यामार्फत बाह्ययंत्रणेव्दारे सेवा उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना दि. १.२.२०१९ ते निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून त्यांचे सदर कालावधीचे वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पुढील कालावधीसाठी सदर ५ पदांना निविदा अंतिम करून पदभरती झाल्याच्या दिनांकापासून ते ११ महिने पुर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत अशा ११ महिन्यांचा कालावधीसाठी मंजूरी देण्यात येत आहे.

०३. यासाठी होणारा खर्च पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मागणी क्रंमाक झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (०७) (०१) पु.ल.देशपांडे कला अकादमी, मुंबई (अनिवार्य), १३ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन त्या त्या वर्षाच्या मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

०४. हा आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र २०१३/१३/विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १०७८ भाग-पहिला, उप विभाग-चार खर्चाच्या संकीर्ण बाबी संबंधी प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अ.क्र.११ अन्वये, प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींन्वये काढण्यात आला आहे.

०५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०६१७१७३३२९७१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.06.19 12:19:50 +05'30'

(बाळासाहेब सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
२. प्रशासकीय अधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६. निवडनस्ती (सां.का.२).